दै. सत्यप्रभा दि. ११.०२.२५

## खून का बदला खून? : एकजण गंभीर जखमी

# शहरात गोळीबाराचा थरार, एकाचा मृत्यू



**नांदेड, दि. १० :** अनेक दिवसांनंतर पुन्हा नांदेड शहर सोमवारी सकाळी गोळीबाराने हादरले. शहरातील शहीदपुरा भागात दुचाकीवरून आलेल्या एकाने कारमधील दोघांवर गोळ्या झाडल्या. त्यानंतर हल्लेखोर पसार झाला. या गोळीबारातील जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. त्यातील एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दरम्यान, या गोळीबाराच्या घटनेमागे दहशतवादी रिंदा याच्या भावाच्या खून प्रकरणाची पार्श्वभूमी असल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. हल्लेखोराच्या शोधासाठी वेगवेगळी पथके पाठविण्यात आली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहीदपुरातील वाहनतळावर सोमवारी सकाळी एका कारमध्ये बसलेल्या गुरमीत सिंग जगिंदरसिंग सेवादार आणि रवींद्रसिंग दयासिंग राठोड यांच्यावर गोळीबार करण्यात आला. यातील गुरमीत सिंग हा खुनाच्या प्रकरणात १२ दिवसांपूर्वीच पॅरोलवर बाहेर आला होता. आरोपीने यावेळी चार ते पाच गोळ्या झाडल्या. तर एका भाविकाच्या चारचाकी वाहनातून एक गोळी आरपार गेली. घटनास्थळावर पोलिसांना गोळ्यांच्या तीन पुंगळ्या सापडल्या. गोळीबारानंतर आरोपी दुचाकीवरून पसार *(पान दोनवर)*

### खून का बदला खून?

नांदेडात रिंदा आणि माळी परिवारात गेल्या अनेक वर्षांपासून शत्रुत्व आहे. त्यातून दोन्ही बाजूच्या अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यातच रिंदाचा भाऊ सत्यपाल याचाही खून झाला होता. या खुनात शिक्षा भोगत असलेला गुरमीत सिंग हा पॅरोलवर नांदेडात आल्यावर त्याच्यावर गोळीबार झाला. त्यामुळे खून का बदला खून? असा तर काही प्रकार होता काय? या दृष्टीने पोलीस तपास करीत आहेत.

### रिंदाच्या भावाच्या खुनातील आरोपी

दहशतवादी हरविंदरसिंग रिंदा याचा भाऊ सत्येंद्रसिंह उर्फ सत्या याचा २०१५ मध्ये खून झाला होता. या खून प्रकरणात काही जणांविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. या प्रकरणात गुरमीत सिंग सेवादारला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यात तुरुंगातून तो ३० दिवसांच्या रजेवर नांदेडात आला होता. त्यानंतर मित्र रविंद्रसिंग याच्यासोबत तो सकाळी या परिसरात आला असता त्याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या.

### सीसीटीव्हीची तपासणी

या प्रकरणात पोलिसांनी हल्लेखोराच्या शोधासाठी वेगवेगळी पथके पाठविली आहेत. आरोपींची ओळख पटवण्यासाठी या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.